RNI No. MAHBIL /2009/35530

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष ८, अंक २२(२)] गुरुवार, ऑगस्ट ४, २०२२/श्रावण १३, शके १९४४ [पृष्ठे ३, किंमत : रुपये २३.००

**असाधारण क्रमांक ४५**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

| | पृष्ठे |
|---|---|
| **सन २०२२ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ८.—** महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश. . . . . | १-३ |

**ग्राम विकास विभाग**

बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई ४०० ००१,
दिनांक ४ ऑगस्ट २०२२.

**MAHARASHTRA ORDINANCE No. VIII OF 2022.**

AN ORDINANCE
FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA ZILLA PARISHADS
AND PANCHAYAT SAMITIS ACT, 1961

**सन २०२२ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ८.**

**महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही ;

**आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम,
१९६२ चा १९६१ यात आणखी सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक
महा. ५. व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे ;

**त्याअर्थी, आता,** भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ च्या खंड (१) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, पुढील अध्यादेश प्रख्यापित करीत आहेत :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अध्यादेशास, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या (दुसरी सुधारणा) अध्यादेश, २०२२ असे म्हणावे.

(२) तो, तात्काळ अंमलात येईल.

सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५ याच्या कलम ९ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ (यात यापुढे ज्याचा निर्देश, " मुख्य अधिनियम " असा केला आहे) याच्या कलम ९ मध्ये, पोट-कलम (१) मधील, खंड (अ) मध्ये, " पंचाऐंशीपेक्षा अधिक नसतील आणि पंचावन्नपेक्षा कमी नसतील इतके " या मजकुराऐवजी, " पंचाहत्तरापेक्षा अधिक नसतील आणि पन्नासपेक्षा कमी नसतील इतके " हा मजकूर दाखल करण्यात येईल. १९६२ चा महा. ५.

प्रक्रिया रद्द करणे.

**३.** मुख्य अधिनियम आणि त्याखाली केलेले नियम यांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जेथे महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या (दुसरी सुधारणा) अध्यादेश, २०२२ याच्या प्रारंभाच्या दिनांकापूर्वी, राज्य निवडणूक आयुक्ताने किंवा, यथास्थिती, राज्य शासनाने,— २०२२ चा महा. अध्या. ८.

(एक) जिल्ह्याची, निवडणूक विभागांमध्ये विभागणी करण्याची आणि जिल्ह्यामधून निवडून द्यावयाच्या सभासदांची संख्या निर्धारित करण्याची ; किंवा

(दोन) मतदार विभागाची, निर्वाचक गणांमध्ये विभागणी करण्याची ; किंवा

(तीन) जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांमधील सभासदांच्या जागांच्या आरक्षणाची,

प्रक्रिया सुरू केली असेल किंवा पूर्ण केली असेल तेथे, अशी प्रक्रिया रद्द करण्यात आली असल्याचे मानण्यात येईल आणि या अध्यादेशाद्वारे सुधारणा केलेल्या मुख्य अधिनियमाच्या तरतुदींनुसार नव्याने करण्यात येईल.

अडचणी दूर करण्याचा अधिकार.

**४.** (१) जर या अध्यादेशाद्वारे सुधारणा केलेल्या, मुख्य अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणताना कोणतीही अडचण उद्भवल्यास, राज्य शासनास, प्रसंगानुरूप उद्भवेल त्याप्रमाणे, ती अडचण दूर करण्याच्या प्रयोजनांसाठी, त्याला आवश्यक किंवा इष्ट वाटेल अशी, या अध्यादेशाद्वारे सुधारणा केलेल्या, मुख्य अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसलेली कोणतीही गोष्ट, **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे, करता येईल.

(२) या कलमान्वये काढलेला प्रत्येक आदेश, तो काढल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहासमोर मांडण्यात येईल.

## निवेदन

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ (१९६२ चा महा. ५) याच्या कलम ९ च्या पोट-कलम (१) मध्ये, जिल्हा परिषदांची रचना करण्याची तरतूद आहे. राज्य निवडणूक आयोगाद्वारे ठरविण्यात येतील अशा, जिल्ह्यातील मतदार विभागांतून प्रत्यक्ष निवडणुकीद्वारे निवडून आलेल्या सभासदांचा, जिल्हा परिषदेमध्ये समावेश असेल, तथापि, असे की, जिल्हा परिषदेच्या प्रादेशिक क्षेत्राची लोकसंख्या आणि अशा जिल्हा परिषदेमधील निवडणुकीद्वारे भरावयाच्या जागांची संख्या, यांमधील गुणोत्तर, व्यवहार्य असेल तेथवर, संपूर्ण राज्यभर सारखेच असेल.

२. जिल्ह्यातील मतदार विभागांतून प्रत्यक्ष निवडणुकीद्वारे निवडून आलेल्या, पंचाऐंशीपेक्षा अधिक नसणाऱ्या व पंचावन्नपेक्षा कमी नसणाऱ्या सभासदांचा, जिल्हा परिषदेमध्ये समावेश असेल अशी तरतूद करण्यासाठी महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या (सुधारणा) अधिनियम, २०२१ (२०२२ चा महा. १८) याद्वारे कलम ९ च्या उक्त पोट-कलम (१) मध्ये सुधारणा करण्यात आली आहे. लोकसंख्येची संभाव्य वाढ विचारात घेऊन उक्त सुधारणा अधिनियमाद्वारे जिल्हा परिषदांच्या सभासदांची किमान व कमाल संख्या वाढविण्यात आली आहे.

३. राज्यातील ग्रामीण क्षेत्रांचे, नागरी क्षेत्रांमध्ये रूपांतर करण्याची प्रक्रिया जलद गतीने सुरू आहे. तसेच, ग्रामीण क्षेत्रांचा, लगतच्या महानगरपालिकांच्या क्षेत्रांमध्ये समावेश केल्यामुळे आणि काही ग्रामीण क्षेत्रांचे, नागरी क्षेत्रांमध्ये रूपांतर झाल्यामुळे, ग्रामीण क्षेत्रांच्या प्रत्यक्ष लोकसंख्येत सातत्याने घट होत आहे. म्हणून, २०२१ ची जनगणना पूर्ण झाल्यानंतर, त्यानुसार लोकसंख्येच्या आकडेवारीच्या आधारे सभासदांची किमान व कमाल संख्या विनिर्दिष्ट करणे इष्ट वाटत आहे.

४. वरील वस्तुस्थिती विचारात घेता, उक्त सुधारणा अधिनियमाच्या पूर्वी उक्त अधिनियमामध्ये विनिर्दिष्ट केलेली सभासदांची संख्या पुनःस्थापित करण्यासाठी, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ याच्या कलम ९ मध्ये सुयोग्य सुधारणा करणे इष्ट वाटत आहे.

५. राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही आणि उपरोक्त प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ यात आणखी सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे, म्हणून, हा अध्यादेश प्रख्यापित करण्यात येत आहे.

मुंबई,
दिनांक ३ ऑगस्ट २०२२.

**भगत सिंह कोश्यारी,**
महाराष्ट्राचे राज्यपाल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**राजेश कुमार,**
शासनाचे अपर मुख्य सचिव.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.